# Greenlawns School, Worli.

वार्षिक परीक्षा (द्वितीय-सत्र २०२५-२६)

| | | |
|---|---|---|
| इयत्ता - सहावी | विषय- मराठी | गुण - ८० |
| दिनांक - २६/२/२०२६ | | वेळ - २ तास |

सूचनाः- सगळे प्रश्न अनिवार्य आहेत.

शुद्ध भाषा व सुवाच्य लेखन अपेक्षित आहे.

---

<u>भाषा विभाग</u>

प्रश्न १) खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा. (१०)

1. माझा आवडता खेळ

२. माझे गाव

३. मी नदी बोलतेय

प्रश्न २) खालील मुद्द्यांचा आधारे गोष्ट तयार करून शीर्षक द्या. (७)

मुद्दे: तहानलेला कावळा -- चंबूत पाणी -- चोचीत न पोचणे -- पाण्यात खडे टाकणे -- पाणी वर येणे -- तहान भागणे -- तात्पर्य.

प्रश्न ३) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

सकाळची वेळ होती. आकाश स्वच्छ होते आणि सूर्याची कोवळी किरणे जमिनीवर पसरली होती. गावाच्या कडेला असलेल्या शाळेकडे विद्यार्थी आनंदाने आणि उत्साहाने चालले होते. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना हिरवीगार झाडे उभी होती आणि पक्ष्यांचा किलबिलाट वातावरण प्रसन्न करत होता.

शाळेत पोहोचल्यावर विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छ केला व शिस्तीत प्रार्थनेसाठी रांगेत उभे राहिले. प्रार्थनेनंतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वेळेचे महत्त्व समजावून सांगितले. वेळेचे योग्य नियोजन आणि नियमितपणा यामुळे यश मिळते, असे त्यांनी सांगितले. हे ऐकून विद्यार्थ्यांनी वेळेचे पालन करणे आणि आपले काम नीट करण्याचे ठरवले.

प्रश्न :-

१) सकाळच्या वातावरणाचे वर्णन कसे केले आहे? (२)

२) विद्यार्थी शाळेकडे कसे चालले होते? (२)

३) शाळेत पोहोचल्यावर विद्यार्थ्यांनी कोणकोणती कामे केली? (२)

४) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वेळेबाबत काय समजावून सांगितले? (२)

५) वाक्य बनवा :- १.गाव २.सकाळ (२)

## व्याकरण विभाग

प्रश्न ४) खालील सूचनांनुसार उत्तरे लिहा.

अ) समानार्थी शब्द लिहा. (२)

१. जीवन - २. भूमी -

आ) विरुद्धार्थी शब्द लिहा. (२)

१. सत्य x २. ऊन x

इ) लिंग बदला. (२)

१. चुलता - २. श्रीमान -

ई) वचन बदला. (२)

१. उत्तर - २. निरोप -

उ) संख्या अक्षरात लिहा. (२)

१) ५६ - २) ८० –

ऊ) कोणत्याही तीन प्राण्यांची नावे लिहा. (३)

## साहित्य विभाग

प्रश्न ५) अ) खालील प्रश्नाची उत्तरे थोडक्यात लिहा. (१२)

१. गणित विषय वैष्णवीचा लाडका होण्यासाठी बाबांनी कोणते उपाय सुचवले?

२. नदीच्या काठावरचे लोक कुंदाला कोणत्या सूचना देत होते?

3. नयना सुगरण पक्ष्याबद्दल काय म्हणाली?

४. तुम्ही रझियाचे 'हितचिंतक' आहात या नात्याने तिला कोणत्या सूचना द्याल?

आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (४)

१. नदीकाठच्या मोठ्या झाडाचे नाव काय?

२. वैष्णवीला पत्र कोणी लिहले?

3. सुगरण पक्षी कशाने सुबक व भारी घरटी विणतो?

४. कुंदाने कोणाचा जीव वाचवला?

इ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. (४)

१. --------------- सुट्टीत मी गावी येणार आहे.

२. पाहता पाहता कुंदा पट्टीची --------------- बनली होती.

3. कुंदाने क्षणात नदीच्या पात्रात --------------- घेतली.

४. गुरुजींनी सुगरण पक्ष्याची --------------- केली.

ई) कोण कोणास म्हणाले. (२)

१. "काय रे मुलांनो, काय पाहत आहात?"

२. "पाण्याचा वेग वाढतो आहे. माघारी फिर."

उ) शब्दार्थ लिहा. (3)

१. गलका वाढणे -

क) आवाज वाढणे ख) अवाज वाढणे ग) आवाज वाढने घ) आवाज वाडने

२. निराश -

क) नराज ख) नाराज ग) नाराझ घ) नारज

३. शाबूत राहणे –

क) टिकून राहणे ख) ठिकून राहणे ग) टिखून राहणे घ) टिकून रहने

## कविता विभाग

प्रश्न ६) अ) खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (४)

१. कोणाचे पापड भिजले?

२. चंद्रावरती शाळा कितव्या शतकात भरेल?

३. चंद्रावरच्या शाळेत मुले कशातून जातील?

४. चंद्रावरच्या शाळेत कशाचे ओझे पाठीवरती नसणार?

आ) कोण ते लिहा. (२)

१. भुंकत सुटलेली- २. हसत म्हणणाऱ्या -

इ) खालील दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करा. (४)

पी. टी. --------------------

---------------------------

---------------------------

---------------------------रहाल.

ई) कवितेतील शब्दांचे शेवटचे अक्षर सारखे येणारे शब्द लिहा. (२)

१. शाळा - २. कटकट –

उ) शब्दार्थ लिहा. (3)

१. गिल्ला करणे -

क) घोंदल करणे ख) गोंदल करणे ग) घोंडळ करणे घ) गोंधळ करणे

२. शतक-

क) शभंर ख) संभर ग) शंभर घ) शम्भर

३. ऐन दुपारी –

क) भार दुपारी ख) भर दुपरी ग) भार दूपारी घ) भर दुपारी

समाप्त